
# जीएसटी

## केलेल्या सुधारणांमुळे रिफंड मिळणे अधिक सोपे



ॲड. विनायक आगाशे

जीएसटी परिषदेच्या ५६ व्या बैठकीत केवळ कराच्या दरात सुधारणा करण्याच्या बाबतच निर्णय झाला असे न्हवे तर व्यवसाय करताना येणाऱ्या अडचणी बाबत देखील मार्ग काढण्याचे निर्णय झाले असून त्यानुसार एकेक निर्णय पुढे येत आहेत.

निर्यातदारांना दिलेल्या जीएसटीचा रिफंड मिळण्यासाठी आवश्यकती पाउले देखील उचलली जात आहेत. रिफंडच्या संदर्भात कायद्यात आणि नियमात बदल करण्यात आलेले आहेत. त्यासंदर्भात नोटिफिकेशन निघत आहेत. नोटिफिकेशन निघताच या नवीन तरतुदींचे कायद्यात रुपांतर होईल. या संबंधात सरांशरूपाने असे म्हणता येईल की रिफंड मिळण्यासाठी केलेल्या अर्जात कोणतीही त्रुटी नसल्यास आणि सर्व तरतुदींचे पालन झाले असल्यास मागितलेल्या रिफंड रक्कमेपैकी ९०% रिफंड ची रक्कम ही तात्पुरत्या स्वरुपात मंजूर होईल असे अशी तरतूद नियम ९१[२] करण्यास आलेली आहे.

एवढेच नव्हे तर Inverted Duty Structure मुळे सुद्धा रिफंड येणाऱ्या व्यापाऱ्यांचा समावेश या कलमामध्ये [Sec.54 (6)] करण्यात आलेला आहे. त्यामुळे Exporter, Deemed Exporter, SEZ व Inverted Duty Structure या व्यापारी मंडळींना अडकून पडलेले भांडवल मोकळे होण्यास मदत होईल आणि त्याची आर्थिक चणचण देखील दूर होवू शकते.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की बहुतांश खऱ्या निर्यातदरांचे रिफंड मंजूर होण्यास कोणतीही अडचण येईल असे वाटत नाही.

कलम ५४ [१४] मधील तरतुदीप्रमाणे रिफंड मिळण्यासाठी Threshold चे Limit [रुपये १०००] देखील काढण्यात आलेले आहे.

अलीकडेच दिनांक १७ /०९ /२०२५ रोजी निघालेल्या Notification [ Notification No.14/2025-Central Tax dated 17-09-2025 ] मुळे खाली नमूद केलेल्या व्यापारी मंडळींना वरील तरतूदीचा लाभ मिळणार नाही.

| S.No | Chapter/Heading/Sub-heading/Tariff item | Description of Goods |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | 0802 80 | Areca Nuts |
| 2 | 2106 90 20 | Pan Masala |
| 3 | 24 | Tobacco And Manufactured tobacco substitutes |
| 4 | 3301 | Essential oils |

**Posted By : SMAK INFO - Tax Awarness**